MHRG110010772021

# नियमित दिवाणी दावा क्र.८६/२०२१ मधील नि.क्र.४२ खालील आदेश

(पांडुरंग नाटेकर वगैरे वि. सदाशिव साळुंखे)

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीचे कथन असे आहे की, सदरचा दावा कराराचे विशेष पुर्ततेकरीता आहे. दाव्यात प्रतिवादी हजर झाले असून दावा चौकशी करता नेमला आहे. मात्र वादीने अद्याप पुरावा सुरु केलेला नाही. दावा मिळकत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांच्या मालकीची असल्याबाबत तसेच सुवर्णा शरद आंबोणकर, अशोक राजाराम साळुंखे, उषा मनोहर जागडे व प्रतिवादी सदा हे कै. राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे वारस असल्याबाबत वाद नाही. प्रस्तुत दाव्यातील साठेखत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी वादीस करुन दिले आहे. दावा कलम १ नुसार मिळकतीबाबतचे साठेखत कै. राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी वादीस करुन दिले असल्यामुळे व प्रतिवादी क्र.१ ते ४ हे त्यांचे वारस असल्यामुळे ते साठेखत प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेवर बंधनकारक आहे. दावा कलम १४अ मध्ये "प्रतिवादी यांनी चे" ठिकाणी "प्रतिवादी १ ते ४ यांनी", दावा कलम १४ब मध्ये " प्रतिवादीच्या" ठिकाणी "प्रतिवादी १ ते ४ यांनी", दावा कलम १४क मध्ये दावा मिळकतींचे साठेखत प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचेवर बंधनकारक आहे असे ठरविण्यात यावे. दावा कलम १२अ मध्ये सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात बदल होणार नाही दाव्याचे काम चौकशीला नेमले असले तरी वादीने पुरावा

सुरु केलेला नाही. वादीकडून सदर दुरुस्ती करणे राहून गेले आहे. त्याबाबतची दुरुस्ती करणेबाबत वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत म्हणणे दाखल करुन वादीच्या अर्जातील कथनास विरोध दर्शविला आहे. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कैफियत दिलेनंतर दाखल केला आहे. प्रतिवादीचे कैफियतद्वारे बचाव सादर केलेनंतर वादीस बचावाला अनुसरुन दुरुस्ती मागता येणार नाही. प्रतिवादी राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे वारसदार असल्यानेच वादींनी त्यांना प्रतिवादी केलेले आहे. त्यामुळे वादींनी दावा दाखल करताना दुरुस्ती अपिलातील नमूद मजकूर कथन करणे कायद्यात अभिप्रेत आहे असे असताना दुरुस्ती अर्जाद्वारे दाव्यात दुरुस्ती करणेबाबतचा अर्ज प्रतिवादीवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

८. संपुर्ण दाव्याचे अवलोकन करता, वादीने मुळ दावा प्रतिवादी यांचे विरुध्द कराराची विशेष पुर्तता करुन मिळणेकरीता व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावा हा कराराची पुर्तता करुन मिळणेकरिता आहे. वादीने सदरचा दावा हा केवळ सदा राजाराम साळुंखे यांच्याविरुध्द दाखल केला होता. वादीच्या म्हणण्याप्रमाणे वादीच्या हक्कामध्ये करार हा राजाराम लक्ष्मण साळुंखे यांनी करुन दिलेला आहे.

राजाराम लक्ष्मण साळुंखे हे दिनांक ०९.१२.२०२३ रोजी मयत झाले. मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांना सदा राजाराम साळुंखे व्यतिरिक्त इतर तीन वारसदार आहेत. प्रतिवादींना म्हणणे दाखल करुन सदर बाब मान्य केलेली आहे. अशा परिस्थितीत अर्जात नमूद केलेले प्रतिवादी क्र.२ ते ४ हे मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे वारस असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे वादी कथन करत असलेल्या कराराच्या पुर्ततेकरिता मयत राजाराम लक्ष्मण साळुंखे यांचे सर्व वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहेत. वादीने मागितलेली दुरुस्ती केलेस दाव्याच्या मुळ स्वरुपात काहीही बदल होत नाही. दावा हा सुनावणीला लागला असतला आजतागायत वादीने पुरावा दाखल केलेला नाही, त्यामुळे सदर दुरुस्ती केल्यास प्रतिवादींच्या हक्कास कोणतीही बाधा येत नाही. वादीने मागितलेली दुरुस्ती ही मंजूर झालेस दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास मदतच होणार आहे. त्यामुळे सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीच्या कोणत्याही हक्कावर बाधा येत नाही. प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र.४२ वरील अर्ज प्रतिवादी क्र.१ ला र.रु.२००/– खर्च (कॉस्ट) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

MHRG110010772021

२.	वादीने पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरुस्ती करुन

दुरुस्त प्रत दाखल करावी.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.04.09 18:24:41 +0530

माणगाव.	[श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः–०९.०४.२०२६.	दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.